**नि. दि. दा. क्र. १९/२०१०**
**ज्ञानेश्वर वि. मोहन**
**नि.क्र.६८**

**शपथेवर पुढिल सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. पी. एस. सायरे**

**१.** मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. ते मला दाखविण्यात आले. त्यातील मजकुर बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. प्रतिज्ञापत्र **नि. क्र. ६८** वर दाखल केले आहे. नि. क्र. ७४ सोबत दाखल केलेले कागदपत्रे दाखविण्यात आले. अ. क्र. ०१ वर मला तेजराम गोविंदराव खोब्रागडे यांनी करुन दिलेले ईसार पावती करारनामा सत्यप्रत दाखल केली आहे. त्यावर माझी, तेजराम आणि चंद्रभागा प्रतिवादी क्र. ०२ ची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **अर्टिकल–अ** देण्यात येते. अ. क्र. ०२ वर वाद मिळकतीचा संयुक्त मोजणी नकाशा दाखल केला आहे. अ.क्र. ०३ मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रीट याचिका क्रमांक २४२७/२००५ मधील निर्णयाची साक्षांकित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. क्र. ७७** देण्यात येते. अ. क्र. ०४ वर ताबा पावती सत्यप्रत दाखल केली आहे. प्रतिवादी क्रमांक ०२ यांनी मंडळ अधिकारी यांना लिहुन दिलेली ताबा पावती आहे. त्यास **अर्टिकल –ब** देण्यात येते. अ. क्र. ०५ वर प्रतिवादी क्र. ०२ हिने प्रतिवादी क्र. ०२ यांना लिहुन दिलेली बक्षीस पत्राची सांक्षाकित प्रत दाखल केली आहे. त्यास **अर्टिकल–क** देण्यात येते. अ. क्र. ०६ वर पारशिवनी येथील न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्राची साक्षांकित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि. क्र. ७८ ओळखीपुरते** देण्यात येते.

**०२.** आता मला **नि. क्र. ७६** सोबत दाखल केलेले कागदपत्रे दाखविण्यात आले. अ. क्र. ०१ उप–विभागीय पोलीस अधिकारी यांना माहिती अधिकाराखाली घरफोडी दरम्यान चोरी झालेली फाईल बाबत केलेल्या तक्रारीची प्रत व पत्र दाखल केले आहे. त्यास **नि. क्र. ७९** देण्यात येत आहे. अ. क्र. ०२ वर तोंडी रिपोर्टची छायांकित सत्यप्रत दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र. ८०** देण्यात येत आहे.

**तोंडी विनंतीवरुन पुढिल सरतपास तहकुब**

| | |
|---|---|
| **श्रवणोत्तर स्विकृती** | **समक्ष** |
| **( ओं. ज. कुलकर्णी )** | **( ओं. ज. कुलकर्णी )** |
| **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पारशिवनी** | **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पारशिवनी** |
| **जि. नागपूर** | **जि. नागपूर** |
| **दिनांक:– ०७–०६–२०२३** | |

**पुढील सरतपास शपथेवर श्री पियूष सायरे वकील साहेबः**

३. आज रोजी नि.८२ यादीसोबत कागदपत्र दाखल केले आहे. अ.क्र.१ वर अंजनाबाई हिने मला लिहून दिलेले मृत्यूपत्राची पळताडीत प्रत दाखल केली आहे. त्यावर अंजनाबाईची सही व अंगठा आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. अ.क्र.२ वर अंजनाबाईने चंद्रभागाबाई हिला लिहून दिलेल्या खरेदीपत्राची सत्य प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.८३** ओळखीपुर्ती देण्यात येते. अ.क्र.३ आणि ४ वर वादीमिळकतींचे ७/१२ उतारे दाखल केले आहे. त्यास **नि.८४ व ८५** देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री भुपेश पाटील वकील साहेबः

तोंडीविनंतीवरून उलटतपास पुढील तारेखपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृती

( ओं. ज. कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पारशिवनी
जि. नागपूर
दिनांक:११.०७.२०२३

समक्ष

( ओं. ज. कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पारशिवनी
जि. नागपूर